H&RA™
WESTERN INDIA
Estd : 1951

### गायक शान यांचे आवाहन; खार परिसरात जनजागृती

# मुंबईकरांनो, मनापासून करा मतदान

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. २८ : लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मुंबई उपनगर जिल्ह्यातील चार मतदारसंघांसह शहरातील सहा मतदारसंघांत २० मे रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या दिवशी मुंबईकरांना मतदान करण्याचे आवाहन प्रसिद्ध गायक शानने केले.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांमध्ये जनजागृतीसाठी मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. या उपक्रमांचा एक भाग म्हणून मुंबई उत्तर मध्य लोकसभा मतदारसंघांतर्गत येणाऱ्या विधानसभेच्या वांद्रे पश्चिम मतदारसंघांतर्गत मतदार जागरूकता आणि सहभाग (स्वीप) कार्यक्रमांतर्गत रविवारी सकाळी आर. व्ही. टेक्निकल स्कूल, रामकृष्ण मार्ग, खार जिमखाना येथून 'व्होट टू व्होट रॅली' काढली होती. या रॅलीत गायक शान यांनी उपस्थितांशी संवाद साधला. आपले मतदान हा लोकशाहीचा आत्मा आहे. प्रत्येकाने मतदान करून राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे. त्यानंतरच बाहेरगावी जाण्याचे नियोजन करावे, असे आवाहन केले आहे. यावेळी 'आपलं मत आपला अधिकार', 'बुढे हो या जवान - सभी करे मतदान', 'माय व्होट - माय फ्यूचर',' आदी घोषणाही दिल्या गेल्या.



गायक शान (शंतनू मुखर्जी)

मतदानाचा टक्का वाढावा, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. त्याचाच एक भाग म्हणून हॉटेल्समध्ये पंधरा ते तीस टक्के सवलत दिला आहे. यासाठी बोटावर असलेली शाई दाखवणाऱ्या प्रत्येकाला सवलतीचा लाभ आहे.

**- प्रदीप शेट्टी**, अध्यक्ष, हॉटेल-रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडिया

## हॉटेलमध्ये विशेष सवलत

- मतदानाच्या दिवशी सुटी असल्याने फिरण्यासाठी अनेकजण बाहेर पडतात. त्यामुळे मतदानाची टक्केवारी वाढावी, यासाठी हॉटेल आणि रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडियाने मतदानाची शाई दाखवा आणि हॉटेलवर डिस्काउंट मिळवा, अशी घोषणा केली आहे.
- मतदान करणाऱ्यांना हॉटेलवर पंधरा ते तीस टक्के सवलत मिळणार आहे. संघटनेच्या या निर्णयामुळे मतदारांना हॉटेलमधील रुचकर, चविष्ट जेवणाचा आनंद घेता येणार आहे.